# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २९/०४/२०२४ (सोमवार) सकाळ

---

### अट्टल चोरटा उमरेड पोलीसांच्या ताब्यात, घरफोडीतील संपुर्ण दागीने हस्तगत

थोडक्यात हकीकत अशी की, १४/०३/२०२४ रोजी दुपारी ०१/०० वा. ते ०२/०० वा. दरम्यान फीर्यादी भास्कर श्रीराम जुमडे वय २७ वर्ष, रा. वनिता विद्यालय मंगळवारी पेठ उमरेड हे नेहमी प्रमाणे स्वत:च्या घराला ताला लावुन दुकाणात गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचा ताला तोडून आत प्रवेश केला व घराच्या कपाटातील सोन्याचे दागीने कि. १,९५,०००/— रु. व नगदी १,७५,०००/— असा एकून ३,७०,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला अश्या फीर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद करून उमरेड पोलीस तपास करीत होती.

तपासा दरम्यान आरोपीची गुन्हा करण्याची पध्दती नुसार व गोपनीय माहीती द्वारे सदरचा गुन्हा हा **आरोपी प्रविण अशोक डेकाटे वय २५ वर्ष, रा. मोहाडी जि. भंडारा** याने केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला नवेगार बांध जि. गोंदीया येथुन ताब्यात घेवुन त्याला अटक करण्यात आली. अटके दरम्यान त्याच्या कडून (१) एक सोन्याचा पदक असलेला मंगळसुत्र, (२) सोन्याचा गोफ, (३) दोन सोन्याचे लॉकेट, (४) एक सोन्याची अंगठी, (५) सोन्याचे कानातील रींग (६) सोन्याचे कानातील रींग असा गुन्ह्यात चोरी गेलेला सोन्याचा संपुर्ण १,९५,०००/— रु चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमुद आरोपी याच्या विरूध्द यापुर्वी सुध्दा पोलीस स्टेशन मध्ये घरफोडीचे अनेक गुन्हे दाखल आहे. आरोपी हा घराला कुलुप लागुन बंद असलेल्या घराला लक्ष करीत असतो असे त्याने विचारपुस दरम्यान सांगीतले.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अप्पर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजा पवार उमरेड विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली उमरेड पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद घोंगे, पो.उप.नि. दिनेश खोटेले, पोलीस अमंलदार प्रदिप चवरे, राधेश्याम कांबळे, पंकज बड़े गोवर्धन शहारे, समाधान पवार व सायबर सेल चे सतीश राठोड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर